दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५४ • Title - Code :- MAHMAR49513 • बुधवार दि.१५ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Scan QR code to visit... Epaper Portal









# नव्या पर्वाचा युवा शिलेदार : मिलिंद भोयर



"हजार डोळ्यांमधले पाणी
माझ्या डोळ्यांमध्ये जमते
हजार हृदये गहिवरती तर
मन माझेही गहिवरते
असे हजारासंगे आहे
जडलेले माझे नाते"

**सत्तेच्या व पदाच्या लालसेपोटी,स्वहितासाठी, स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी पक्षीय विचार पायदळी तुडवून कोलांटीउडी मारणाऱ्यांची संख्या कमी नाही . अशा घटना ज्या ज्या वेळी घडतात त्या त्या वेळी पक्षाशी एकनिष्ठ असलेल्या काही नेत्यांची नावे जनमाणसातून घेतली जातात. त्यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पार्टी वरोरा तालुका अध्यक्ष मिलिंद मनोहर भोयर यांचे नांव अग्रक्रमाने घेतले जाते. त्यामुळेच खऱ्या अर्थाने ते एकनिष्ठता व पक्षनिष्ठेचा मानदंड ठरतात.अशा व्यक्तिमत्वांतील लक्षवेधी व्यक्तिमत्व म्हणजे वरोरा येथील मिलिंद भोयर. मिलींद भोयर यांच्याकडे सामान्यातील सामान्य तसेच कार्यकर्त्यांच्या अंत:करणाला भिडण्याची वेगळी हातोटी आहे. समोर येणाऱ्या व्यक्तीच्या खांद्यावर हात टाकत काय म्हणता भाऊ, काय चाललंय असे विचारत त्या व्यक्तीच्या मनातील वेदना जाणून घेण्याची त्यांची लकब हे देखील त्यांच्या यशाचे गमक आहे. राजकारण करतांना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचून त्यांच्यात ते सहजपणे समरस होतात. दारात मदतीसाठी येणाऱ्याला विन्मुख न पाठविता आपल्या परीने त्याला मदत करणे हा स्थायीभाव त्यांनी जपला आहे. ग्रामीण लोकजीवन व शेतात राबणारे कष्टकरी यांच्याविषयी असणारी तळमळ सदैव त्यांच्या बोलण्यातून व कृतीतून व्यक्त होते. त्यामुळे वयोवृद्धांपासून तर तरुणाईतही त्यांच्या नेतृत्वाला मान्यता आहे. आज त्यांचा ४५ वा वाढदिवस आहे. अशा लोकल्याणार्थ सतत झटणाऱ्या नेत्याच्या व्यक्तित्वाचा वेध घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.त्या निमित्ताने ....**



**आशिष मारोती घुमे**
संपादक,मो.९०११७०८८४०
e sahyandrinews@gmail.com

हे वर्णन ज्यांच्या व्यक्तिमत्त्वाला लागू पडते असे व्यक्तिमत्व म्हणजे वरोरा येथील सर्वपरिचित असलेले मिलिंदभाऊ. मिलिंद भोयर यांचा जन्म वरोरा तालुक्यातील वंधली येथील कै.मनोहराव मारोतराव भोयर या सुसंस्कृत घराण्यात १५ नोव्हेंबर, १९७८ रोजी झाला. आई वडिलांच्या आग्रहास्तव प्राथमिक ते पदविकेचे शिक्षण त्यांनी तालुक्याला म्हणजे वरोरा येथे घेतले .त्यांचे वडील कै.मनोहरराव भोयर व आई पुष्पाताई भोयर यांच्याकडून समाजकारणाचे व राजकारणाचे बाळकडू त्यांनी घेतले. आई वडिलांच्या आदर्श विचारांचा वारसा घेऊन त्यांनी समाजकारण व राजकारणामध्ये महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांनाच प्रवेश केला. जागतिक समाजसेवक बाबा आमटे यांच्या महारोगी सेवा समिती द्वारे संचालित आनंद निकेतन महाविद्यालयात शिक्षण घेत असतांना त्यांना सामाजिक कार्याची गोडी निर्माण झाली. स्वतः ग्रामीण भागात जन्मलेल्या व बालपण घालवलेल्या मिलिंद भोयर यांना लहानपणापासूनच ग्रामीण लोकजीवन व शेतकरी, कष्टकरी, वंचीतांबद्दल आत्मीयता होती. त्याकाळात ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अनेक समस्या होत्या. त्या सोडविण्यासाठी त्यांनी नागपूर विद्यापीठ संघर्ष समितीची स्थापना केली. त्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या समस्या, त्यांना प्रवेश मिळवून देणे, त्यांच्या प्रत्येक समस्यांना वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी या माध्यमातून केले. त्यानंतर ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना त्या काळात शिष्यवृत्ती मिळत नव्हती त्या साठीही त्यांनी ओबीसी क्रांती दल मध्ये कार्य केले. त्या माध्यमातून ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी लढा देत संघर्ष केला.भोयर घराण्याला राजकीय वारसा लाभलेला आहे. मिलिंद भोयर यांचे वडील कै. मनोहरराव यांचे मोठे वडील कै.बाजीरावजी भोयर हे त्या परिसरातील मोठे राजकारणी होते. वरोरा पंचायत समितीचे पहिले सभापती म्हणून विराजमान होण्याचा बहुमान त्यांना मिळाला . तालुक्यातील राजकारणातील एक मोठं नाव त्यांचं होत.त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत कै. मनोहरराव राजकारणात आले.२५ वर्षे गावचे सरपंच,सेवा सहकारी संस्थेचे २५ वर्षे अध्यक्ष, अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी केली. त्याच सोबत वरोरा तालुका काँग्रेस कमेटीचे तालुका अध्यक्ष,जिल्हा काँग्रेस कमेटीचे उपाध्यक्ष,खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष,ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ वरोरा (कर्मवीर विद्यालय) सचिव, जिल्हा परिषद सदस्य , कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती अशी अनेक पदे त्यांनी भूषविली.एवढेच काय तर त्या काळात मनोहरराव व पुष्पाताई दोघेही पती पत्नी पंचायत समितीत वेगवेगळ्या क्षेत्रातून निवडून आल्याचा रेकॉर्ड त्यांच्या नांवे जमा आहे हे विशेष. आई वडीलांकडून मिळालेले समाजकारण व राजकारणाचे बाळकडू अंगीकारत त्यांनी २००१ मध्ये (एनएसयूआय) विद्यार्थी काँग्रेसमध्ये प्रवेश केला . त्यांच्या कार्याची दखल घेतलं पक्षाने त्यांच्यावर वरोरा शहर अध्यक्ष पदाची धुरा दिली.या काळात त्यांनी विद्यापिठाच्या निवडणुकीत विद्यार्थी काँग्रेसचे महाविद्यालयीन प्रतिनिधी विद्यापीठात निवडून पाठविले ,विद्यार्थ्यांच्या समस्या,त्यांना मदत तसेच विविध सामाजिक उपक्रम त्यांनी राबविले. त्यानंतर २०१० मध्ये त्यांनी वंधली येथील सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणूक लढविली.यात त्यांचे मोठे बंधू नरेंद्र व प्रवीण यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. या निवडणुकीत त्यांचे संपूर्ण पॅनल निवडून आले.या काळात २०१० ते २०१२ मध्ये ते पहिल्यांदा उपसरपंच म्हणून विराजमान झाले त्यानंतर २०१२ ते २०१५ तीन वर्षे ते सरपंच राहिले .या कार्यकाळात त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून २०१५ ला झालेल्या निवडणुकीत त्यांचे संपूर्ण पॅनल भरघोस मताने निवडून आले. त्यांच्या खांद्यावर पुन्हा एकदा सरपंचपदाची धुरा आली.या पदाचा वापर करीत त्यांनी गावात अनेक लोकोपयोगी कामे





केली.२०१० ते २०२० या त्यांच्या सरपंच व उपसरपंच पदाच्या कारकिर्दीत गावातील आरोग्य उपकेंद्राचे नूतनीकरण तसेच अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या,गावात जीएमआर वरलक्ष्मी फाउंडेशनच्या मदतीने जलशुद्धीकरण केंद्र आणले . गावात सीसीटी व्ही कॅमेरे लावण्यात आले.संपूर्ण गावांतील रस्त्यावर सिमेंट काँक्रीटीकरण ,वृक्षलागवड,पशुवैधकीय दवाखान्याचे नुतनीकरण,बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण असे विविध कार्य त्यांनी केले . या कार्याची दखल घेत जिल्हापरिषद चंद्रपूर तर्फे दिला जाणारा जिल्हा परिषद पुरस्कार ग्रामपंचायतला मिळाला.त्याचसोबत तालुकास्तरावरील स्मार्ट ग्राम पुरस्कार,संत गाडगेबाबा स्वच्छ ग्राम पुरस्कार,नवभारत समूहाकडूनही त्यांना पुरस्कृत करण्यात आले आहे. विशेष म्हणजे जिल्हा परिषद चंद्रपूर येथील २०१० ते २०२० या कार्यकाळात आलेल्या सर्वच मुख्य कार्यपालन अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतला भेटी दिल्या व ग्रामपंचायततर्फे राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे कौतुक केले . याच काळात २०१७ मध्ये त्यांनी त्यांच्या धर्मपत्नी सौ संजीवनीताई यांना पंचायत समितीची निवडणूक लढवून त्यांना विजयी करून आणले. उपसभापतीपदी विराजमान केले.या काळात त्यांनी नवनवीन उपक्रम राबविले. ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना ,नागरिकांना त्रास होऊ नये व प्रशासनावर आपला वचक राहावा याकरिता संजीवनीताई यांनी पंचायत समितीमध्ये प्रत्येक विभागात सीसीटीव्ही कॅमेरे लावले . क्षेत्रात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्यात विशेष करून बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सबलीकरण यावर भर देण्यात आला. आरोग्य शिबीर , रक्तदान शिबीर असे विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात आले . २०१९ मध्ये त्यांचा संपर्क दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्याशी आला . ते शिवसेनेतून काँग्रेसमध्ये आले होते . या काळात पक्षाची तालुकाध्यक्ष पदाची धुरा त्यांच्या खांद्यावर होती . लोकसभा निवडणुकीत पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी पूर्णत्वास नेली. या काळात अनेक प्रलोभने त्यांना देण्यात आली होती असे ते सांगतात पण त्या प्रलोभनांना कुठलेलंही खतपाणी न देता त्यांनी पक्षनिष्ठ राहून काम केले.लोकसभेनंतर प्रतिभाताई धानोरकर यांना विधानसभेची उमेदवारी देण्यात आली.यातही त्यांनी मेहनत घेत स्वतःच्या जिल्हापरिषद क्षेत्रातून त्यांनी अनेक मतांची लीड त्यांना मिळवून दिली हे विशेष. या कार्याची दखल घेऊन धानोरकर दाम्पत्यांनी त्यांना संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष केले.या काळात त्यांनी निराधारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य केले .अनेक निराधारांना न्याय मिळवून दिला .बँकांमार्फत निराधाऱ्यांच्या पैशावर व्याज खाण्याचा गोरखधंदा त्यांनी बंद केला .महिनोंमहिने पेंडिंग राहणाऱ्या फाईल्स त्यांनी नियमित काढणे सुरु केले . अशाप्रकारे ते निराधारांसाठी आधार ठरले. ३ वर्षांचा हा कार्यकाळ त्यांच्या अतुलनीय, लोकोपयोगी कामाने सर्व अधिकारी व वंचितांसाठी नेत्रदीपक ठरला.अजूनही निराधाऱ्यांच्या समस्यांना घेऊन ते प्रशासनाशी भांडत असतात, त्यांची बाजू मांडत असतात . दिवाळीपूर्वी त्यांनी निवेदन देत आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर दिवाळी मध्ये थकीत असलेले अनुदान वाटप करण्यात आले हे विशेष .ते सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष राहिलेले आहेत . १९६२ पासून ते आजतागायत वंधली या गावात काँग्रेसची सत्ता असून त्यात भोयर परिवाराचे मोठे योगदान आहे . सध्या त्यांचे मोठे बंधू प्रवीण मनोहरराव भोयर हे सरपंच आहेत . अशा या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाकड़े युवा वर्ग तसेच तालुक्यातील जनता नव्या पर्वाचा युवा शिलेदार म्हणून बघत आहे . आज त्यांचा ४५ वा वाढदिवस आहे.दैनिक सह्याद्रीचा राखणदार परिवारातर्फे त्यांना निरोगी व निरामय आरोग्य लाभो या शुभकामनांसह जन्म दिवसाच्या हार्दिक शुभेच्छा .

# स्थितप्रज्ञ गुरुनानक देवजी



नानक या नावाचा अर्थ आहे, जो एकाग्र आहे, एक देव पाहतो आणि त्यावर विश्वास ठेवतो आणि द्वैत पाहत नाही . गुरुनानकदेवजी यांच्या संदर्भात एक अद्भुत घटना घडली जी अनाकलनीय होती, ती विशद करणे तेवढेच महत्वाचे असल्यामुळे ती इथे उद्गृत करणे गरजेचे आहे जेणे करुन जनसामान्यांना त्याचा बोध घेता येईल तर ती घटना येणे प्रमाणे – गुरुनानकदेवजी जगाचा उध्दार करीत भाई बाला–मरदाना सोबत अरब देशात पोहचले. तेथील बादशाहा लाजबरद खूप जुल्मी होता. भारतातील कोणीही तेथे गेला तर तो त्याची मान कापत असे. हे पाहून लोक खूप दु:खी व्हायचे तेव्हा त्यांनी देवाची आराधना केली. त्यांची प्रार्थना देवाने ऐकली त्यामुळे गुरुनानकांनी आकाशवाणीव्दारे निरोप पाठवला की, मी तुमच्या भक्तीवर प्रसन्न आहे. तुम्हाला हा खलीता (चोला) पाठवित आहे. तो घालून तुम्ही अरब देशात जा व तेथील लोकांना सदगुणांचा उपदेश द्या व त्यांना परमेश्वरासोबत जोडा. तो चोला गुरुजींनी घातला ज्यावर तुर्की, अरबी, फारसी व हिंन्दी या भाषामध्ये ईश्वराची आद्य:अक्षरे लिहीली होती. गुरुनानकदेवजी नगराच्या बाहेर बसले असतांना तेव्हा तेथील लोक लाजवरद बादशाहाला म्हणाले, महाराज ! दरबाराच्या बाहेर एक संत बसला आहे, त्याच्या गळयात चोला आहे व त्यावर कुराण शरीफचे ३० पाने लिहिले आहेत. तेव्हा बादशाहा वजिराला म्हणाला, बाहेर जाऊन त्या संताच्या गळयातील चोला काढून आणा. वजीर गुरुजीं जवळ गेला व म्हणाला, हे फकीरजी तुमच्या गळयातील हा खलीता मला द्या, गुरुजी एक ही शब्द न बोलता शांत राहिले. वजीराच्या आज्ञेचे पालन करत नोकरांनी तो चोला गुरुजींच्या अंगातून काढण्याचा प्रयत्न केला, पण तो चोला काही केल्या निघत नव्हता. सगळयांनी ताकद लावली पण तो चोला निघाला नाही. शेवटी थकून ते दरबारात गेलेत त्यांनी घडलेला प्रकार बादशाहाला सांगितला. त्यावर बादशाहाने क्रोधित होऊन आदेश दिला की, तुम्ही त्या फकिराला समुद्रात बुडवून द्या. नोकरांनी गुरुजींना आदराने समुद्रात सोडल्यावर गुरुजींवर कसल्याही प्रकारचा परिणाम झाला नव्हता. त्यामुळे सर्व लोक अचंभित झाले होते.

जेव्हा बादशाहाने ही गोष्ट ऐकली, तेव्हा तर तो आणखी क्रोधीत झाला व त्याने आदेश दिला की, त्या फकिराला आगीत जाळून टाका. पण गुरुजींना आग्निची झळही पोहचली नाही. तेव्हा हतबल होऊन बादशाहा रागाने म्हणाला, हा फकीर निश्चितच जादुगर दिसतो किंवा त्याला दैवशक्ति प्राप्त असावी. आता असे करा की, कोणत्याही उंच पहाडावरुन त्याला धक्का देऊन खाली पाडा व संपवा. वजिराने गुरुजींना उंच पहाडावरुन धक्का देऊन खाली पाडले पण आश्चर्य असे की, सर्व लोकांनी गुरुजींना लगेच फुलांच्या मंचावर बसलेले पाहिले. हे चमत्कारी उत्तर ऐकून बादशाहा वजिराला म्हणाला, हा साधू निश्चितच खूप मोठा किमयागार असावा असे वाटते त्याची खात्री झाल्यावर त्यांनी आदेश दिला की, एक मोठा खड्डा खोदून त्याला आत पुरवा व वरुन दगड माती टाकून त्याला दाबून टाका. बादशाहाने सांगीतल्याप्रमाणे वजीराने तसेच केले, खड्डयावर हजारो मण दगड ठेवून सगळे निश्चित होऊन घराकडे निघुन गेलेत.जेव्हा दूसऱ्या दिवशी लोक त्या स्थानावर गेले तर गुरुजी त्यांना त्याच जागेवर बसलेले दिसले. गुरुबाणीत ही हेच सांगितले आहे की, 'जिस तू राखौ तिस कोन मारै' देवतारी त्याला कोण मारी जेव्हा बादशाहाने ही गोष्ट ऐकली, तेव्हा तो वजिराला म्हणाला, या फकिराला माझ्या समोर आणा व त्यांची मान छाटून वेगळी करा, तोही प्रकार करुन बघीतला परंतू सर्व व्यर्थ. त्यानंतर राजाने गुरुजींना सुळावर चढवण्याचा आदेश दिला, तेव्हा ते सुळे हिरवेगार झाले. त्यामुळे तर आता सगळे लोक हैराण झाले. इकडे बादशाहाला दरबारातील बुध्दीमान लोक म्हणाले की, हा फकीर तर कोणी महापूरुष दिसत आहे किंवा असे वाटते की देवाने फकिराचे रुप धारण केले असावे, हे कळायला मार्ग सुचत नव्हता. मन सुन्न बधीर झाले. कारण फकीरावर कसल्याही प्रकारचा आघात होत नव्हता, त्यामुळे सर्व बैचेन झाले होते.

इकडे भाई बाला व मरदाना गुरुजींना प्रार्थना करतात की, हे गुरुदेव ! हा राजा अत्यंत पापी आहे. याला नक्की दंड दिला पाहिजे. गुरुजी शांतपणे म्हणाले, आम्हाला तर त्या देवाची आज्ञा आहे की, आम्ही विश्वातील लोकांना सत्यमार्गावर चालणे शिकवावे. ज्याची देव रक्षा करतो, त्याला कोणीही मारु शकत नाही. जो मनुष्य जसे कर्म करतो, त्याचे फळ त्याला देवच देत असतो. आमचे कोणाशीही वैर–विरोध नाही, जो जसे करेल, तो तसे भरेल. जशी करणी, तशी भरणी या उक्तीपासुन कोणीही सुटु शकत नाही. बादशाहाला पश्चाताप झाला तो अनवाणी पायांनी गळयात कपडा टाकून तोंडात तिनका ठेवून गुरुजींच्या चरणाजवळ आला व म्हणला महाराज ! मी अधर्मी, पापी व खूप मोठा गून्हेगार आहे, म्हणून मला क्षमा करा. बादशाहा गुरुजींच्या चरणावर नतमस्तक झाला व हात जोडून म्हणू लागला. हे देव रुपी साधू तुम्ही मला व माझ्या देशाला क्षमा करा. जो कुविचार मनात माझ्या आला होता त्याऐवजी सद्विवेक मार्ग मला दाखवा अशी विनवनी करु लागला.

गुरुद्वारातील महान विद्वान कवी व गजलकार भाई नंदलालनी गुरुजींची स्तुती करत म्हटले आहे, 'गुरुनानक आमद नाराइन सुरुपा, हुमाना निरंजन निरंकार रुपा' अर्थ असा की देव स्वत: गुरुनानक यांचे रुप धारण करुन म्हणाले, हे बादशाहा आम्ही तुमच्यावर तेव्हा प्रसन्न होऊ, जेव्हा तुम्ही प्रण कराल की, यापुढे मी कधीही कोणत्याही मानवाला दु:खी करणार नाही जातिव्देष व पक्षपात सोडून सदैव न्याय करेल सदाचारानी राहील, जर तुम्ही प्रण करुनही जर असे वाईट काम करत राहाल तर लक्षात ठेवा, तुम्हाला खुप मोठा दंड दिला जाईल. पुन्हा कधीही तुमच्यावर दया करणार नाही, बादशाहा म्हणाले, हे गुरुदेव ! आता तर माझ्यात तिनका तोडायचे ही सामर्थ्य राहिले नाही. जशी आपण आज्ञा कराल त्याप्रमाणे संपूर्ण आयुष्य आपल्या उपदेशाप्रमाणे वागेल.

गुरुजी म्हणाले, त्या परमेश्वराचे नामस्मरण करा व आपल्या देशात लंगर करण्याची प्रथा सुरु करा. गरीबांची सेवा करा, पापाचा दुरुनच त्याग करा, सर्वांना न्याय द्या तेव्हा बादशाहाने गुरुजींच्या सर्व आज्ञेचे पालन करण्याचे प्रण केले व त्याच दिवसापासून बादशाहा गुरुजींचा शिष्य झाला. तेथील जनता ही गुरुनानकदेवजी महाराजांची शिष्य झाली. काही दिवस गुरुजी त्या बादशाहाचे पाहुणे म्हणून राहिले व नंतर पुढच्या प्रवासाला निघाले. अशा स्थितप्रज्ञ गुरुनानकदेवजींनी शिख संप्रदायाची स्थापना केली व प्रथम गुरु म्हणुन गुरुवाणीत नावलौकीक मिळविला.

गुरुनानक यांनी अनेक ठिकाणी संगत (धर्मशाळा) आणि पंगत (लंगर) सुरुवात केली. आजही संगत व पंगत मुळे गुरुनानकांचे अनुयायी प्रत्येक दिवशी एकत्र येतात आणि सबद–किर्तन करतात नानकदेव आपल्या गुरवाणीत म्हणतात की, 'नानक उत्तम निच न कोई' आपण ईश्वराच्या नजरेत सर्व समान आहोत कारण मानव जात एक आहे. तो खालच्या जातीचा, मी उच्च जातीचा हा भेद नष्ट करण्याचा प्रयत्न केला. जात–पात नष्ट करण्यासाठी त्यांनी जो गुरु (लंगर) चा निशुल्क पायंडा पाडला तो वाखण्याजोगा आहे. आम्ही सर्व ईश्वरांची लेकरे आहोत हा अविभाव त्यांनी (लंगर) च्या रुपाने मग तो गरीब असो की श्रीमंत त्यांनी एकाच पंगतीमध्ये बसण्यास सर्वांना भाग पाडले. आजही ही प्रथा अखंड पणे गुरुद्वारामध्ये राबविली जाते या पासुन प्रत्येक मानवाने बोध घेतला पाहिजे. गुरूनानक यांनी कधीही 'देवांच्या ट्रिनिटी' वर विश्वास ठेवला नाही किंवा देव मानवी स्वरूपात जन्माला येऊ शकतो यावर विश्वास ठेवला नाही. शीख धर्मात त्यांनी हिंदू आणि इस्लाम या दोन्ही धर्मांचा मेळ साधण्याचा प्रयत्न केला. अंधश्रद्धा, जातीभेद, कर्मकांड यावर त्यांचा कधीच विश्वास नव्हता. त्यांचे शब्द श्री गुरु ग्रंथ साहिब, पवित्र शास्त्रात समाविष्ट आहेत. मी मोठा तू छोटा हा भेद पाळला नाही, तेव्हाच ही जात–पात नष्ट होईल. असा आदर्श प्रत्येकांनी आपल्या अंगी जोपासला पाहिजे. कारण 'आदि सचू, जुगादी सचू है भी, सचू नानक होसी भी सचू' आपला दृढ विश्वास असायला पाहिजे की, संत साधनांचा सतनाम पाणी सच्चनाम ही आहे. सत्य हे सत्य आहे, जे असत्य होऊ शकत नाही. सत्याशिवाय काही नसुन संपूर्ण सत्य आहे, असेही देवजी म्हणतात. सतनाम वाहेगुरु, सतनाम वाहेगुरु, सतनाम वाहेगुरु कहा गया है. बाकी सर्व मिथ्या सर्व थोतांड आहे. दरवर्षी लोक रस्त्यावरून फटाके आणि मिरवणूक काढून गुरुनानक यांचा जन्म साजरा करतात. शीख मंदिरांमध्ये – गुरुद्वारा – शिखांचा पवित्र ग्रंथ, गुरु ग्रंथ साहिब, मोठ्याने वाचला जातो. घरांमध्ये आणि कार्यालये, दुकाने अशा सार्वजनिक ठिकाणी मेणबत्त्या पेटवल्या जातात. शीख परंपरेत नानकजी जयंती त्यांच्या पहिल्या शीख गुरूंच्या जन्माच्या वर्धापन दिनाचा उत्सव साजरा केला जातो. ज्यांनी शीख समुदायाला आकार देण्यात आणि मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली . पर्यायाने गुरपूरब किंवा गुरुपुरब असे शब्दलेखन केले जाते. गुरूपुरव या दिवशी पहाटे लवकर गुरुद्वारात कार्यक्रम सुरू केले जातात. पहाटे सकाळच्या विशेष प्रार्थना गायल्या जातात. कथा आणि कीर्तन यांचे आयोजन केले जाते. लंगर भोजन व्यवस्था करण्यामागे सर्व समानता असा हेतू आहे. सर्वजाती जमातीचे लोक एकत्र येवुन येथे प्रसाद स्वीकारतात. संध्याकाळी पुन्हा प्रार्थना केल्या जातात. लहान मुले विविध कार्यक्रम सादर करतात. मध्यरात्री जन्म उत्सव साजरा होताना विशेष प्रार्थना केल्या जातात. या सर्व प्रार्थना गुरू ग्रंथ साहिब या पवित्र ग्रंथातील आहेत.

शीख एक देव, निर्माता आणि सर्व मानवजातीच्या समानतेवर विश्वास ठेवतात. गुरूनानक यांनी शिखांना कौटुंबिक जीवन जगायला शिकवले आणि तीन पटीचे बोधवाक्य पाळले ज्यामुळे त्यांना दैनंदिन जीवनात आणि त्यामध्ये देवाशी जोडण्यास मदत झाली: नाम जपो – प्रार्थना करा आणि देवाचे स्मरण करा. किरत करो – प्रामाणिक जीवन जगा. देशातील जेवढे संत होऊन गेलेत त्यांनी तथागत भगवान बुध्दांनी सांगीतलेल्या मार्गाचा अवलंब केल्याचे आम्हाला आढळून येईल. कोणताही संत बघा, कित्येक वर्षापूवी तथागतांनी सांगीतलेल्या उपदेशाचा प्रचार या देशातील संतानी आपापल्या परिने केले हे नाकारुन चालणार नाही. भारतीय अध्यात्मिक शिक्षक जे शीख धर्माचे पहिले गुरू गुरुनानक होते, एकेश्वरवादी धर्म हिंदू आणि मुस्लिम प्रभाव एकत्र करतो. अशा सत्याचा मार्ग दाखविणाऱ्या महान सतिगुरु श्री गुरुनानकदेवजींचा जन्म कार्तिक पौर्णिमा आणि गुरुनानक जयंती दिनी १५ एप्रिल १४६९ ला श्री नानकाना साहिब येथे आई तृप्ता देवी आणि वडील कालू खत्री यांच्या घरी झाला. ज्याला गुरुनानकचा प्रकाश उत्सव आणि गुरुनानकदेवजी जयंती असेही म्हणतात. एकता, श्रध्दा आणि प्रेमाचा संदेश देणारे शिख धर्माचे संस्थापक गुरुनानकददेव यांच्या ५५४ व्या जयंती निमित्त त्यांना शत: शत प्रणाम !वाहेगुरु जी का खालसा वाहे गुरु जी की फतेह। सर्व शीख बांधवाना गुरुनानक जयंती च्या खूप खूप शुभेच्छा !




प्रविण बागडे
नागपूर
मो : ९९२३६२०९१९


# छंदवेळी छायाचित्रकार प्रियंका पुनवटकर...



देवाला हात जोडून,
स्वस्थ बसायचं नसंत,
देव घडवित नाही,
आपणचं घडायचं असत !'

कवितेच्या या चार ओळी प्रियंकाच्या बाबतीत अगदी खऱ्या ठरतात. शेतकरी कुटुंबात जन्मला आलेली प्रियंका नंदोरी, ता.वरोरा, जि. चंद्रपूर या लहानश्या गावातून शिक्षणासाठी चंद्रपूर आली. शिक्षणसुरू असतांना लहानपणापासून मनात सुप्त असलेला आपला आवडीता फोटोग्राफी छंद तीला स्वस्थ बसू देत नव्हता. एक छायाचित्र अनेक शब्द सांगू शकतात, आपल्या आयुष्यात घडलेल्या किंवा समाजामध्ये घडलेल्या क्षणाला आठवणीच्या स्वरुपात एखादं छायाचित्रच कैद करून ठेवू शकतो किंवा आठवणीत ठेवू शकतो असे म्हणणाऱ्या प्रियंकाला फोटोग्राफीचे वेड लावले होते .आपल्या नावासमोर 'वृत्त छायाचित्रकार प्रियंका सुधाकर पुनवटकर' असे लिहून यावे या स्वप्नणाच्या शोधात ती चंद्रपूर येथील सुप्रसिद्ध छायाचित्रकार देवानंद साखरकर यांच्या कडुन छायाचित्रणाचे धडे घेत आहे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ती छायाचित्र काढून प्रादेशिक वृत्तपत्रांना द्यायला लागली. लोकांच्या गर्दीत जाऊन सामाजिक सारस्थ, सामाजिक जनजीवन, समाजीक स्वारस्थ, ऐतिहासिक धरोहर, धार्मिक सण– उत्सव ,निसर्ग सौंदर्य अश्या अनेक गोष्टी ती आपल्या कॅमेऱ्यातून टिपू लागली, तिचे विविध वृत्तपत्रांना छायाचित्र प्रसिद्ध होऊ लागले आपल्या आवडीला आणि सुप्त गुणांना वाव देत ,आपला आवडता विषय चांगला हाताडयासाठी तीने एम. ए. मास. कम्युनिकेशन पत्रकारितेचे शिक्षण पूर्ण केले. कॅप्शन फोटो च्या माध्यमाने छायाचित्र प्रियंका पुनवटकर असे वृत्तपत्रातील नाव पाहून प्रियंकाला मनस्वी आनंद झाला. वृत्तपत्राच्या छायाचित्र प्रसिद्ध झाल्याने या क्षेत्रात काम प्रोत्साहन मिळत गेले व सातत्याने कॅप्शन ऑफ बीट छायाचित्र काढू लागली.

कधी पायदळ, कधी सायकलनी तर कधी एकटी लोकांच्या गर्दीत जावून आपल्याला चांगले छायाचित्र कसे मिळेल ती शोधू लागली.प्रियंकाच्या या कार्याला यश येवु लागले, आपल्या कार्यात सातत्य ठेवल्याने अवघा २ वर्षात प्रियंकाचे – लोकमत, हितवाद, तरुण भारत, पुण्य– नगरी, महाराष्ट्र– टाईम्स, देशोन्नती, महासागर, सकाळ, नवराष्ट्र, नवभारत, दैनिक भास्कर Lokmat Times Nagpur, या प्रादेशिक वृत्तपत्रातांमधुन प्रियंकाचे २०० हून अधिक छायाचित्र प्रसिद्ध झालेले आहे ती इथेच थांबली नसुन सातत्याने छायाचित्र काढत असते.तसेच मागील वर्षी श्रमिक पत्रकार संघ,चंद्रपुर तर्फे घेण्यात आलेल्या वृत्त छायाचित्रकार–२०२१ या स्पर्धेमध्ये मा.सुधीर भाऊ मुनगंटीवार (वन सांस्कृतिक मंत्री) यांच्या हस्ते वृत्त छायाचित्रकार–२०२१ हा पुरस्कार प्रियंकाला मिळाला व चंद्रपूर जिल्ह्यातील ती पहिली महिला वृत्तछायाचित्रकार ठरली ,त्याबद्दल तिचे अभिनंदन आणि समोरच्या भविष्यासाठी शुभेच्छा.नेहमी चेहऱ्यावर हास्य असणाऱ्या प्रियंकानी टिपलेली छायाचित्रे वृत्तपत्र वाचकांना, निसर्ग प्रेमींनाही आनंद देऊन जातात. प्रियंकाच्या छायाचित्रातून मिळणारा आनंद असाच सदा दरवळत राहो ! हीच मनस्वी इच्छा ....

मृगाकडे कस्तूरी आहे,
फुलात गंध आहे,
सागराकडे अथांगता आहे,
माझ्याकडे काय आहे,
असे म्हणत रडत बसू नका,
अंधाराला जाळणारा एक सूर्य तुमच्यातही
लपला आहे.'


कु.प्रणाली मधुकर रागीट
(एम.ए.मास कम्युनिकेशन)
मो. ७०८३२२९२७०














# अखेर...संजय गांधी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान वाटप सुरू

## कांग्रेसच्या मिलिंद भोयर यांच्या निवेदनाची दखल

**वरोरा । प्रतिनिधी**

वरोरा तालुक्यातील संजय गांधी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान मागील चार महिन्यापासून रखडले होते. त्यामुळे लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले होते. याची दखल घेत वरोरा भद्रावती निर्वाचन क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शन वरोरा तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष मिलिंद भोयर यांनी लाभार्थ्यांना अनुदान वाटप करण्याबाबत निवेदन दीले होते. त्या निवेदनाची दखल घेत रखडलेले अनुदान लाभार्थ्यांना वाटप करणे सुरू झाले आहे .माहे जून २०२३ पासून संजय गांधी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान शासनाकडून प्राप्त न झाल्यामुळे लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिले होते. त्यांची दिवाळी अंधारातच जाईल


दैनिक सह्याद्रीचा राखणदार

संजय गांधी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान त्वरित द्या अन्यथा आंदोलन- मिलिंद भोयर

की काय? असे वाटत असतानाच भद्रावती वरोरा विधानसभा क्षेत्राच्या आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरोरा काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष मिलिंद भोयर यांच्या नेतृत्वात लाभार्थ्यांनी वरोरा तहसीलदार मार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांचे सचिव यांना निवेदन देण्यात आले होते. व दिवाळीपूर्वी लाभार्थ्यांना त्यांच्या खात्यात अनुदान जमा करावे व त्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली होती. दिवाळीपूर्वी लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम जमा न झाल्यास संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना घेऊन तहसील कार्यालयातच लाक्षणिक धरणे आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून देण्यात आला होता. त्याची दखल घेत शासनाने अखेर संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान वाटप करणे सुरू केले आहे. त्यामुळे संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यात आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.

# वरोरा तालुक्यातील ग्रामपंचायत खैरगाव बिमा ग्राम पुरस्काराने सन्मानीत

## जिजाऊ ग्राम संघाला ५० हजारांचा पुरस्कार

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील खैरगाव येथे भारतीय जीवन विमा निगम शाखा वरोरा. वरोरा च्या वतीने विमा प्रतिनिधी शारदा प्रमोद नागापुरे. यांनी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात जिजाऊ ग्राम संघ खैरगाव अंतर्गत महिला बचत गटातील महिलांचा जीवन विमा काढून ७७ पॉलिसी व ५ लाख २७ हजार प्रीमियम गोळा केल्यामुळे भारतीय जीवन बीमा निगम शाखा वरोरा कडुन जिजाऊ ग्राम संघ यांना ५० हजार रुपयांचा धनादेश जिजाऊ ग्राम संघाच्या अध्यक्षा पत्राबाई दडमल. सचिव वृंदा नन्नावरे. व उपाध्यक्ष माला वाघ. यांना सुपूर्त करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलित करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोहन गोगुलवार. यांनी आपल्या जीवनात विमाचे महत्त्व काय आहेत हे ग्रामवासीयांना समजावून सांगितले. शाखा प्रबंधक एलआयसी. प्रमुख पाहुणे सचिन उघडे विकास अधिकारी एलआयसी वरोरा यांनी ग्रामवासीयांना विविध



योजनांची माहिती दिली. व सौरभ बहादे साहाय्यक एलआयसी वरोरा. ग्रामपंचायत खैरगावचे सरपंच संदिप दडमल यांनी महिला वर्गाला बचत गटाचे महत्व समजावून सांगितले. माजी उपसरपंच रघुनाथ दडमल. ग्रामपंचायत परसोडाचे सदस्य माला दडमल. पोलीस पाटील सुभाष नन्नावरे. विठ्ठल ननावरे माजी पोलीस पाटील, जिजाऊ ग्राम संघाचे पदाधिकारी पत्राबाई दडमल, वृंदा नन्नावरे, माला वाघ, कल्पना दडमल, सामूहिक सहसाधन महिला प्रतिनिधी खैरगाव या सर्व मान्यवरांच्या हस्ते विमा ग्राम पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.या कार्यक्रमात प्रमोद नागापुरे हे गावासाठी सदैव सामाजिक कार्य करत असतात. म्हणून खैरगाव वासियांनी यांचे शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद नागपूरे, आभार प्रदर्शन सचिन उघडे यांनी केली. कार्यक्रमाचा यशस्वी करिता रवींद्र बल्की, रवींद्र वाघ, वसंता वाघ, यांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.




































**जाहिरात संकलन-वरोरा प्रतिनिधी ग्यानीवंत गेडाम संपर्क:- ७४१०७ ४४७७२**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .